महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

जा. क्रमांक : तंशिविकापु/विवि/विशेष मतदार नोंदणी अभियान/२०२४/1660 दिनांक : १५.०४.२०२४

**परिपत्रकः (कालमर्यादा - १५.०४.२०२४ सायं ४ वाजेपर्यंत)** 15 APR 2024

**प्रति,**
**संचालक/प्राचार्य,**
**या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त,**
**पुणे जिल्ह्यातील सर्व संस्था**
**(३५-बारामती लोकसभा मतदार संघातील १९९ दौंड, २०० इंदापूर, २०१ बारामती, २०२ पुरंदर, २०३ भोर, २११ खडकवासला विधानसभा क्षेत्रातील संस्था वगळून)**

**विषय : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४**
**युवकांसाठी विशेष मतदार नोंदणी अभियान राबविणेबाबत..**
**(३५-बारामती लोकसभा मतदार संघ वगळून)**

संदर्भ : १. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांचे पत्र क्र. उभूसंक्र १३/आस्था-१/कावि/१०७/२०२४ दिनांक ११.०४.२०२४.
२. या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक क्र. तंशिविकापु/शै.वि./२०२४/१६३६ दिनांक १२.०४.२०२४

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भ क्रमांक मधील पत्रामधील प्राप्त निर्देशांनुसार या विभागीय कार्यालयाच्या संदर्भ क्रमांक २ परिपत्रकान्वये आपल्या संस्थेमध्ये **दिनांक १२.०४.२०२४ ते १५.०४.२०२४** या कालावधीमध्ये **'युवा विशेष मतदार नोंदणी अभियान'** राबविणेबाबत सूचित करण्यात आले होते.

सदर विशेष मतदार नोंदणी अभियानाबाबत संबंधित संस्थांनी त्यांच्या स्तरावर विद्यार्थ्यांना एस.एम.एस., Whats app Group, तसेच संस्थेच्या संकेतस्थळावर माहिती देणेबाबत कळविले होते.

या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त संस्थांमध्ये उपरोक्त कालावधीमध्ये राबविण्यात आलेल्या विशेष मतदार नोंदणी अभियानामध्ये होणा-या नव युवा मतदार नोंदणीचा दैनंदिन अहवाल एकत्रितपणे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांना सादर करावयाचा असल्याने, आपल्या संस्थेचा अहवाल सोबत दिलेल्या गुगल फॉर्ममध्ये भरुन या विभागीय कार्यालयाकडे आज **दिनांक १५.०४.२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत** सादर करावा.

सोबत : संदर्भिय पत्र व परिपत्रक व गुगल फॉर्म लिंक.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरिता.

**महाराष्ट्र शासन**
**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**
**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**
**मॉडेल कॉलनी , बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे -४११०१६**
दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in


जा. क्र : तंशिविकापु/शै.वि./२०२४/1636 दिनांक : 12 APR 2024

**परिपत्रक-**

**प्रति,**

प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्तपुणे जिल्हयातील
(बारामती लोकसभा मतदार संघातील दौंड, इंदापूर,बारमती,
पुरंदर,भोर, खडकवासला वगळून) इतर सर्व संस्था, पुणे विभाग.

**विषय : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४**
**युवकांसाठी विशेष मतदार नोंदणी अभियान राबविणेबाबत.**
**(३५ बारामती लोकसभा मतदार संघ वगळून)**

संदर्भ : उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र.१३, पुणे यांचे कार्यालयाचे पत्र क्र.उभूसंक्र.१३/आस्था-१/कावि/१०७/२०२४ दि.११.०४.२०२४

मा. भारत निवडणूक आयोगाचे निरिक्षक यांनी दि.१०.०४.२०२४ रोजी झालेल्या आढावा बैठकीमध्ये पुणे जिल्हयातील मतदार यादीमध्ये १८ ते १९ व २० ते २९ वयोगटातील युवा मतदार यांची नोंदणी अल्प प्रमाणात असल्याने त्यांची नोंदणी करण्याकरिता विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त पुणे जिल्हयातील (३५ बारामती लोकसभा मतदार संघ वगळून) सर्व महाविद्यालयांमध्ये दि.१२.०४.२०२४ ते १५.०४.२०२४ या कालावधीमध्ये युवा मतदार नोंदणी अभियान राबविण्यात यावे. मतदार नोंदणी अर्ज हे ऑनलाईन स्वरूपात देखील भरता येणार असून हे अर्ज https://voters.eci.gov.in या लिंकवरून भरता येणार आहेत. तसेच Voter Search Helpline App द्वारे देखील भरता येणार आहेत. सदर ॲप मोबाईलवर Play Store वरून डाऊनलोड करता येणार आहेत. मतदार नोंदणीसाठी रहिवासी पुरावा म्हणून लाईट बिल/पाणी पटटी बिल, आधारकार्ड, बँकेचे किंवा पोस्टाचे पासबुक, भारतीय पारपत्र (Passport), राज्य शिक्षण मंडळाने निर्गमित केलेले १० वी किंवा १२ वी चे प्रमाणपत्र इ. कागदपत्रे जोडण्यात यावीत.

सदर विशेष मतदार नोंदणी अभियानाबाबत महाविद्यालयांनी आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांना एसएमएस, Whatsapp group तसेच आपल्या संकेतस्थळाद्वारे माहिती देण्यात यावी.

विशेष मतदार नोंदणी अभियानामध्ये होणाऱ्या नव युवा मतदार नोंदणीचा दैनंदिन अहवाल खालील नमुन्यात संदर्भिय पत्राच्या कार्यालयास slaopune13@gmail.com या ई-मेल वर सादर करण्यात यावा. तसेच सदर अभियान दि.१५.०४.२०२४ पर्यंतच राबविण्याची दक्षता घेण्यात यावी.

| अ.क्र | दिनांक | केलेली मतदार नोंदणी संख्या | |
|---|---|---|---|
| | | १८-१९ वयोगट | २०-२९ वयोगट |
| | | | |

सोबत- संदर्भिय पत्र.

( डॉ. द. व्यं. जाधव )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरिता.

SVEEP

उत्सव निवडणुकीचा अभिमान देशाचा

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. १३, पुणे यांचे कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय, दुसरा मजला, बि विंग, पुणे - १
इमेल आयडी - slaopune१३@gmail.com

दिनांक -११/४/२०२४

क्र. उभूसंक्र. १३/आस्था-१/कावि/९०८/२०२४

<u>निवडणूक तात्काळ</u>

प्रति,

१. कुलगुरू
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

२. विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे
पुणे ४११००१

३. विभागीय सहसंचालक तंत्र शिक्षण,
पुणे विभाग, पुणे
पुणे ४११००१

४. शिक्षण अधिकारी
जिल्हा परिषद,पुणे-०१

५. शिक्षण अधिकारी
पुणे महानगरपालिका, पुणे – ०५

६. शिक्षण अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८

विषय:- <u>लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४</u>
**युवकांसाठी विशेष मतदार नोंदणी अभियान राबविणेबाबत**
**(३५ बारामती लोकसभा मतदार संघ वगळून).**

मा. भारत निवडणूक आयोगाचे निरीक्षक यांनी दि. १०/०४/२०२४ रोजी झालेल्या आढावा बैठकीमध्ये पुणे जिल्ह्यातील मतदार यादीमध्ये १८ ते १९ व २० ते २९ वयोगटातील युवा मतदार यांची नोंदणी अल्प प्रमाणात असल्याने त्यांची नोंदणी करण्याकरिता विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यातील **(३५ बारामती लोकसभा मतदार संघ वगळून)** सर्व महाविद्यालयांमध्ये **दि. १२/०४/२०२४ ते १५/०४/२०२४ या कालावधीमध्ये** युवा मतदार नोंदणी अभियान राबविण्यात यावे. मतदार नोंदणी अर्ज हे ऑनलाईन स्वरुपात देखील भरता येणार असून हे अर्ज https://voters.eci.gov.in या लिंकवरून या लिंकवरून भरता येणार आहेत. तसेच Voter Search Helpline App द्वारे देखील भरता येणार आहेत. सदर अप मोबाईलवर play store वरून डाउनलोड करता येणार आहे. मतदार नोंदणीसाठी रहिवासी पुरावा म्हणून लाईट बिल/पाणी पट्टी बिल, आधारकार्ड, बँकेचे किंवा पोस्टाचे पासबुक, भारतीय पारपत्र (Passport), नोंदणीकृत विक्रीखतम नोंदणीकृत भाडे करार, वयाचा पुरावा म्हणून जन्म प्रमाणपत्र, आधारकार्ड, राज्य शिक्षण मंडळाने निर्गमित केलेले १० वी किंवा १२ वी चे प्रमाणपत्र इ. कागदपत्रे जोडण्यात यावीत.

सदर विशेष मतदार नोंदणी अभियानाबाबत महाविद्यालयांनी आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांना एसएमएस, whatsapp group तसेच आपल्या संकेतस्थळाद्वारे माहिती देण्यात यावी.

विशेष मतदार नोंदणी अभियानामध्ये होणाऱ्या नव युवा मतदार नोंदणीचा दैनंदिन अहवाल खालील नमुन्यात इकडील कार्यालयास slaopune13@gmail.com या ई-मेल वर सादर करण्यात यावा.तसेच सदर अभियान **दि. १५/०४/२०२४ पर्यंतच** राबविण्याची दक्षता घेण्यात यावी.

| अ.क्र. | दिनांक | केलेली मतदार नोंदणी संख्या | |
|---|---|---|---|
| | | १८-१९ वयोगट | २०-२९ वयोगट |
| | | | |

(डॉ. सुहास दिवसे) ११/४
जिल्हाधिकारी, तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे

प्रत:-

१) उप जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांना माहितीसाठी

२) मतदार नोंदणी अधिकारी व सहा.मतदार नोंदणी अधिकारी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी सदर उपक्रमाचे राबविताना आपले मतदार संघातील सर्व महाविद्यालयांशी समन्वय साधून उपक्रमांचे आयोजन करताना मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांचे प्रतिनिधी म्हणून कामकाज पाहावे. **(३५ लोकसभा मतदार संघातील १९९ दौंड, २०० इंदापूर,२०१ बारामती, २०२ पुरंदर, २०३ भोर, २११ खडकवासला यांनी सदर विशेष युवा मतदार नोंदणी अभियान राबवू नये याची नोंद घ्यावी.)**